# अॅडव्हान्टेज इंडिया

## फ्रॉम चॅलेंज टू अपॉर्च्युनिटी

**ए.पी.जे. अब्दुल कलाम व श्रीजन पाल सिंग**

अनुवाद

**अंजली ठाकूर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Advantage India : A. P. J. Abdul Kalam & Srijan Pal Singh
Marathi translation by Anjali Thakkur
First published in Marathi by Riya Publications
By arrangement with HarperCollins Publishers India Limited
Copyright © A. P. J. Abdul Kalam and Srijan Pal Singh 2015

**ॲडव्हान्टेज इंडिया– फ्रॉम चॅलेंज टू अपॉर्च्युनिटी :**

ए.पी.जे. अब्दुल कलाम व श्रीजन पाल सिंग

अनुवाद : अंजली ठाकूर

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
अंजली ठाकूर
१४/वेस्ट फ्लोअर, 'ठाकूर बंगला',
जसलिन हॉस्पिटलमागे, धनतोली, नागपूर - ४४००१२
मो. नं. : ९८२३१८३९४०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# अॅडव्हान्टेज इंडिया
## फ्रॉम चॅलेंज टू अपॉर्च्युनिटी

# *अॅडव्हान्टेज इंडिया*

अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम हे २००२ ते २००७ या काळात भारताचे अकरावे राष्ट्रपती होते. ते पद्मभूषण होते, पद्मविभूषण होते व देशाचा सर्वोच्च नागरिकी सन्मान भारतरत्न होते.

१९३१ मध्ये तामिळनाडूमधील रामेश्वरम येथे जन्म घेतलेले डॉ. कलाम यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतून एरोनॉटिकल इंजिनियरिंगचे शिक्षण घेतले होते. भारताचा पहिला उपग्रह SLV-3 याच्या बनविण्यात व त्याचे यशस्वी उड्डाण करण्यात, भारतामध्ये योजनाबध्द अण्वस्त्रे बनविण्यात व १९९८ च्या अणुचाचणीत डॉ. कलामांचा मुख्य सहभाग होता.

ज्येष्ठ राजनीतीकार असल्यामुळे, त्यांनी सतत लोकांच्या संपर्कात राहून, धार्मिक व सामाजिक दऱ्या दूर करण्यात फार मोलाचे काम केले आहे. डॉ. कलामांचे एकच ध्येय होते, ते हे की २०२० पर्यंत भारतास प्रगतिशील नव्हे तर प्रगत राष्ट्र म्हणून गणले जावे. यासाठी ते सतत अनेक आय.आय.टी. मधून आय.आय.एम. मधून भाषणे देत, अनेक सभांमध्ये भाग घेत सतत तरुणांशी संपर्कात राहात असत. २७ जुलै २०१५ रोजी शिलाँगमध्ये तरुणांसमोर भाषण करीत असतानाच त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली. त्यांचा संदेश व त्यांचा प्रभाव देशातील कानाकोपऱ्यात सर्व स्तरांतील लोकांमध्ये अजून पाहायला मिळतो.

श्रीजनपाल सिंग हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद येथील MB- व सुवर्णपदकाचे मानकरी आहेत. त्यांनी बॉस्टन कन्सल्टिंग ग्रुपबरोबर काम केले आहे. ते एक सामाजिक उद्योगपती आहेत, जे शाश्वत प्रगतीची योजना या विषयात प्रवीण आहेत व ग्रामीण क्षेत्रात विशेष काम करतात. २००९-१५ या काळात ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांबरोबर ऊर्जेचे स्वातंत्र्यीकरण व शहरी

सोई ग्रामीण भागात पुरविण्याच्या (PUR) कामाचे विशेष सल्लागार व ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी होते. त्यांनी डॉ. कलामांबरोबर दोन पुस्तके लिहिली आहेत : टार्गेट ३ बिलियन (२०११) व रीइग्नीटेड (२०१५). २०१४ मध्ये स्वित्झरलँड येथे ते सेंट गॅलन लीडरशिप सिंपोझियम येथे 'ग्लोबल लीडर्स ऑफ टुमॉरो' मध्ये निवडले गेले होते. त्यांनी जी. आर. के. रेड्डी यांच्याबरोबर देखील 'स्मार्ट अँड ह्युमन (२०१५) हे पुस्तक लिहिले आहे.

हे पुस्तक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम (१९३१-२०१५), यांच्या अखंड स्मृतीस...ज्यांनी त्यांच्या जीवनातून आपल्याला हा आत्मविश्वास दिला की, मी करू शकेन, आम्ही करू शकू व भारत करू शकेलच.

**– श्रीजन पाल सिंग**

# *प्रस्तावना*
## *दी आयडीआशन वॉक*

स्थळ – १०, राजाजी मार्ग, नवी दिल्ली, काही महिन्यांपूर्वी

**सहभाग**

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम : ए.पी.जे.
श्रीजन पाल सिंग : एस.पी.एस.

**श्रीजन:** गुड मॉर्निंग! आज आपण भारताचे आव्हानात्मक ॲडव्हान्टेज, हे पुस्तक लिहिण्यास सुरुवात करणार आहोत. मी हे जाणण्यास अतिशय उत्सुक आहे की तुम्ही हे पुस्तक कसे पाहात आहात? या पुस्तकाने काय साधणार आहे?

**ए. पी. जे. :** हे फक्त एक पुस्तक नाही. मला वाटते आहे की आपल्या देशास २०२० पर्यंत ज्या काही प्रगती करावयाच्या असतील त्यासाठी आपण ही एक योजना बनवीत आहोत. असे पाहा, की देश एका स्थित्यंतरातून जात आहे – तोही रोज वाढणाऱ्या वेगाने. आपण या बदलाचा आढावा घेणार आहोत, अशा कुठल्या जागा आहेत जेव्हा लोकांनी व सरकारने आपल्याला यात मदत करावी जेणेकरून २०२० पर्यंत आपण एक प्रगत राष्ट्र म्हणून गणले जाऊ, हे प्रत्येक भारतीयाचे ध्येय असले पाहिजे, जे आत्मिक असेल. प्रत्येकाने, मग तो शाळेत असो, कॉलेजमध्ये, ऑफिसमध्ये, कोर्टात किंवा पार्लमेंटमध्ये त्या वाटेने काम केले पाहिजे.

**एस.पी.एस. :** अर्थातच. चला, आपण प्रत्येक भारतीय हे पुस्तक एक वैयक्तिक ध्येय बनवूया. प्रत्येकाने केलेली छोटीशीच गोष्ट, प्रत्येकाने उचललेली

छोटी छोटी पावले, एकत्र येऊन एक मोठा प्रवास घडू शकतो. पण मला एक शंका आहे. हे एवढे मोठे कार्य जमेल का?

**ए. पी. जे. :** भारत एक खूप मोठे राष्ट्र आहे, ज्यात अनेक आव्हाने आहेत. शिवाय, प्रत्येक प्रांताचे प्रश्न वेगळे, परिस्थिती वेगळी व संधीही वेगळ्या. बिहार केरळपेक्षा किंवा जम्मू-काश्मीरपेक्षा वेगळा आहे. त्यामुळे एककलमी कार्यक्रम इथे करून चालणार नाही. पण मला आठवते, माझे गुरू, श्री. सतीश धवन, एकदा म्हणाले होते, तुम्ही एखादे अवघड काम हाती घेतले, तर अडचणी जास्त येणार. पण अडचणींना तुमचा म्होरक्या बनू नका देऊ. तुम्ही त्या अडचणींचा म्होरक़्या बना व त्यावर मात करा. तेव्हाच तुम्ही यशस्वी व्हाल.

**एस.पी.एस.:** अर्थातच. गेल्या एका वर्षात देशात अनेक स्थित्यंतरे घडली – सुरुवात झाली ती सरकार बदलण्याने. अनेक प्रांतीय सरकारे देखील बदलली. नव्या योजना, नवी धोरणे, नवी स्वप्ने उराशी बाळगली जात आहेत व ती पूर्ण करण्यासाठी नवी धडपडही चालली आहे. तुम्हाला यात काय बदल जाणवतो, भारत नक्की कुठे जात आहे?

**ए. पी. जे. :** मला वाटते, नव्या धोरणांसाठी नव्याने काम सुरू झाले आहे, अर्थात जुनी धोरणेदेखील राबविली जात आहेतच. २०२० च्या आधीच्या शेवटच्या पंचवर्षात आपण आलो आहोत. त्यामुळे प्रगत राष्ट्र हे नाव कमविण्याची धडपड व घाई आता केलीच पाहिजे. गरिबी देशातील सर्व ठिकाणाहून काढून टाकली पाहिजे.

**एस.पी.एस.:** म्हणूनच तर आपल्याला अनेक स्तरांवरून एकाच वेळी काम केले पाहिजे. आपली जागा कुठे आहे आता, तुमचा यावर काय विचार आहे?

**ए.पी.जे.:** हो, आपल्याला अत्यंत घाईने ही कामे केली पाहिजेत. एक ध्येय ठेवा व पाहा की कोण कोण कसे कसे, त्या दृष्टीने काम करू शकतील. मला वाटते, यासाठी गट पाडावेत, जे विचार करतील, योजना करतील व प्रामाणिकपणे कामे करतील.

**एस.पी.एस.:** मला आता नेमके ध्येय सांगू द्या, जे देशाच्या प्रगतीचे खांब

आहेत, जे आपण या पुस्तकात सांगणार आहोत. तुम्हाला 'मेक इन इंडिया' याबद्दल काय वाटते? अनेक लोक या बाबतीत थोडे साशंक आहेत, त्याकरिता कारणे अनेक आहेत, शिक्षण, मानसिकता व येथील सोई. तुम्ही भारतीय अण्वस्त्रे, उपग्रह बनविण्याचे व अनेक महत्त्वाच्या योजनांचे नेतृत्व केले आहे. तुम्हाला या 'मेक इन इंडिया' योजनेत काही महत्त्वाच्या अडचणी दिसतात का?

**ए.पी.जे.:** आपण यावर स्पष्टपणे बोलू. 'मेक इन इंडिया' फार महत्त्वाकांक्षी योजना आहे. पण आपल्याला अशीच मोठी स्वप्ने पाहायला हवीत. ब्रिटिशांचे राज्य आले त्याआधी भारताचे व्यापार क्षेत्रात एक मोठेच नाव होते. ब्रिटिशांनी आपली योग्यता रसातळाला नेली. म्हणून मला असे वाटते की, भारतीयांमध्ये ते नेहमीच होते. जागतिक बाजारपेठ, शिक्षण.....हो आपल्याला आय.आय.टी. व आय.आय.एम.च्या खालीसुध्दा बघितलेच पाहिजे. तेथील कार्यकर्ते चांगले व्हावेत यासाठी काम करावे लागेल. सोईच्या बाबतीत मी तुमच्याशी सहमत आहे. भारताने सोईंमध्ये अचाट वाढ केली आहे, पण ती वेडीवाकडी आहे - त्यातील भिन्नता खूप आहे, प्रत्येक प्रांतात. उदाहरणार्थ, टेलिकॉम व इंटरनेट क्षेत्रात अतोनात प्रगती झाली आहे, पण ग्रामीण भागात अजूनही काही ठिकाणी साधी वीज नाही का रस्ते नाहीत. या सोईंकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, जर उद्योजकता वाढवायची असेल तर.

शिवाय, आपल्याला हेही लक्षात घेतले पाहिजे की आपण, फक्त एक कमी किमतीचे, कमी खर्चाचे भाग जोडणारे (असेंब्ली लाईन) होणार नाही ना? जर आपण तसे झालो तर, प्रगतीची किंमत आपल्याला नको इतकी मोजावी लागेल व नागरिक दुःखी होतील ते वेगळेच. आपल्याकडे तरुणांची कल्पनाशक्ती आहे, प्रौढांचा अनुभव आहे व लोकशाहीची विविधता आहे. या तीन शक्ती वापरून आपण संशोधन केले पाहिजे, डिझाईन बनविले पाहिजे व मग ते भारतात बनविले पाहिजे.

**एस.पी.एस.:** बरोबर आहे. मला कळले की डिजिटल इंडियाबद्दल आपले काय मत आहे. त्यातून खेडी, शाळा सर्व जोडू शकतो. भारताने हे सर्व इथल्या शहरांमध्ये तर केलेच आहे.

**ए. पी. जे. :** हो. डिजिटल इंडियात ही शक्ती आहे, ज्ञानही आहे ज्याने खेडी व इतर दूरदूरचे प्रदेश जोडले जाऊ शकतात. तरी आपल्याला साक्षरता वाढविण्याची गरज आहे ज्यामुळे भाषेची, रीतीरिवाजांची फट भरली जाईल.

**एस.पी.एस.:** मला वाटते की डिजिटल इंडिया या योजनेत अपार शक्ती आहे ज्यात आपला फायदाच होईल. कल्पना करा, की आपल्याजवळ प्रत्येक नागरिकाची अशी माहिती आहे जी एकाच क्लिकने आपणास मिळू शकेल. यामुळे किती काम लवकर व जास्त होऊ शकेल. यातून एक फायदा असा आहे की लाचखोरीवर नियंत्रण आपण ठेवू शकू. लाचखोरीवर बोललोच आहे तर आपले त्यावर काय मत आहे? मी अनेक तरुणांना तुम्हाला हा प्रश्न विचारताना पाहिले आहे.

**ए. पी.जे. :** ती एक चळवळ आहे, जी घरातून सुरू झाली पाहिजे, शाळांमध्ये पसरली पाहिजे व नव्या पिढीला त्याविषयी ज्ञान दिले पाहिजे. त्यामुळेच नागरिक म्हणून एक नवा अर्थ मिळेल. यावर उपाय म्हणजे नवीन संकल्पनेचाच विचार व्हावा लागेल व तो आपल्या घरातूनच आला पाहिजे.

**एस.पी.एस.:** आपण कुठल्या नागरिकत्वाविषयी बोलत आहात?

**ए. पी. जे.:** तुम्हाला आठवते का, आपण आझमगढ येथे अचानक एका ठिकाणी थांबलो होतो?

**एस.पी.एस.:** हो अर्थातच! आपण वाराणसीच्या विमानतळावर जाताना.

**ए.पी.जे.:** आता सांगा. मॅनेजमेंटच्या दृष्टीने पाहता तुम्हाला काय दिसले?

**एस.पी.एस.:** मला वाटते, एक छोटासा ढाबा, ज्यात कमी सोई होत्या, पण तिथे कर्तृत्वाला कमी नव्हती मला वाटते. मला आठवते आहे, त्या दुकानदाराने आपल्यासाठी ताजा चहा केला, खायच्या वस्तू गरम